# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१६

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक ०५ ऑगस्ट, २०१६ / श्रावण १४, १९३८ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **महसूल, पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** | |
| **(२)** | **अल्पसंख्यांक विकास आणि औकाफ मंत्री** | |
| **(३)** | **परिवहन मंत्री** | |
| **(४)** | **कृषी आणि फलोत्पादन मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(५)** | **उर्जा, नवीन व नवीकरणीय उर्जा, राज्य उत्पादन शुल्क मंत्री** | |
| **(६)** | **पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय मंत्री** | |
| **(७)** | **भूकंप पुनर्वसन मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३८**

---

**वणी (जि.यवतमाळ) तालुक्यातील मुंगोली गावाचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(१) * ६३९७३ श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वणी (जि.यवतमाळ) तालुक्यातील मुंगोली या गावाच्या चोहोबाजूंनी वेस्टर्न कोलफिल्ड लिमिटेड (वे.को.ली.) या कंपनीचे मातीचे ढिगारे असून वर्धा नदीच्या शेजारी वसलेल्या या गावास कायमच वर्धा नदीच्या पूराचा धोका असतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गावातील नागरीकांनी गेल्या २० वर्षापासून गावाचे पुनर्वसन करण्याबाबत शासनाकडे विनंती करुनही याबाबत कोणतीही कार्यवाही अद्याप करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंगोली गावाचे तातडीने पुनर्वसन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) सद्यस्थितीत या गावातील नागरीकांना विस्थापित केलेले नाही. परंतु वे.को.ली. तर्फे या गावाचे पुनर्वसन करावयाच्या वेळी शासनाच्या प्रचलित धोरणानुसार सर्व प्रकारच्या सुविधा त्यांना पुरविण्यात येतील.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वर्धा जिल्हयातील राष्ट्रीय बियाणे महामंडळाकडून निकृष्ट दर्जाची बियाणे शेतकऱ्यांना वाटप केल्याबाबत

**(२) * ६३७८४ श्री.रणजीत कांबळे (देवळी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वर्धा जिल्हयातील कृषी विभागामार्फत राष्ट्रीय गळीत धान्य व तेलताड अभियान सन २०१५-१६ अंतर्गत उन्हाळी भुईमुग पिक प्रात्यक्षिक करीता राष्ट्रीय बियाणे महामंडळ यांच्याकडून वाटप करण्यात आलेले के-६ बियाणे या वाणास शेंगा न लागल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्या अनुषंगाने जिल्हास्तरीय तक्रार निवारण समितीने प्रत्यक्ष पाहणी करुन शेतकऱ्यांच्या नुकसानीचा अहवाल शासनास सादर केलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) व (२) वर्धा जिल्हयातील प्रात्यक्षिकांतर्गत ५१२ शेतकऱ्यांना अनुदानावर वाटप करण्यात आलेल्या बियाणांपैकी मौजा आंतोरा (ता.आष्टी), ब्राम्हणवाडा (ता.कारंजा), कासारखेडा (ता.आर्वी) या गावातील एकूण २५ शेतकऱ्यांच्या भुईमुगास शेंगा कमी लागल्याबाबत तक्रारी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयास प्राप्त झाल्या होत्या. त्यानुसार जिल्हास्तरीय

तक्रारनिवारण समितीने संबंधित शेतकऱ्यांच्या शेतावर प्रत्यक्ष भेट देवून पाहणी केली. समितीचा अहवाल त्यांनी संचालक (निविष्ठा व गुणनियंत्रण) यांना दिनांक २.६.२०१६ रोजी पाठविला आहे. समितीच्या निष्कर्षानुसार भुईमुग पिकाच्या आऱ्या व शेंगा लागणे या कालावधीत सरासरीपेक्षा तापमान २ ते ३ डिग्री सेल्सिअसने जास्त राहिल्याने आऱ्या व शेंगा विकसित होण्यास विलंब निर्माण झाल्याने शेंगांचे प्रमाण घटले.

(३) वातावरणातील तापमान वाढीमुळे शेंगा लागण्याचे प्रमाण घटले होते. अशा प्रकरणी नुकसान भरपाई देण्याबाबत तरतूद नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लोअर परेल (मुंबई) येथील शापूरजी भरुच्या मिल्सची जमीन अवैधरित्या हस्तांतरीत केल्याबाबत

**(३) * ५३७८९ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोअर परेल (मुंबई) येथील सी.एस.क्र. ६७, २/६५, ३/६५, ६६ व १-ए/६६ मधील २२ हजार ६१८.३४ चौ.मी. क्षेत्राची शापूरजी भरुच्या मिल्सचा भाडेपटटा संपुष्टात आलेली जमीन मुळ मिल मालकाने तीन ग्राहकांना अवैधरित्या हस्तांतरीत करतांना, मुळ भाडेपटटा धारकाला वगळून शेवटच्या दोन ग्राहकांमधील जमीन खरेदी विक्रीचा व्यवहार कागदोपत्री दाखवून सुमारे ३०० कोटी रुपये महसूलाचे आर्थिक नुकसान केल्याचे लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, मुख्य सचिव व प्रधान सचिव (महसूल) यांना दिनांक ०२ मार्च, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने बेकायदा हस्तांतरण केलेली जमीन ताब्यात घेण्याबाबत तसेच खरेदी विक्री व्यवहार करणाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) दि. १.३.२०१६ रोजीचे या विषयाचे लेखी निवेदन प्राप्त झाले आहे.

(२), (३) व (४) या अनुषंगाने जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला असून सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर शासन स्तरावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**मौजे-पुयनी (खुर्द) व जुनूना (ता.वसमत, जि.हिंगोली) येथील शेतक-यांचे निकृष्ट दर्जाच्या बियाणांमुळे झालेले नुकसान**

**(४) * ६३९९८ श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे-पुयनी (खुर्द) व जुनूना (ता.वसमत, जि.हिंगोली) येथील शेतक-यांनी राष्ट्रीय बीज निगम मधुन खरेदी केलेल्या निकृष्ट दर्जाच्या बनावट सोयाबीनच्या बियाण्यांमुळे शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी लागल्याने या शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) अंशत: खरे आहे.

राष्ट्रीय गळीत धान्य व तेलताड अभियान २०१६-१७ अंतर्गत वसमत तालुक्यात मौजे- पुयनी( खुर्द) येथे १०० हेक्टर क्षेत्रावर सोयाबीन प्रकल्प देण्यात आला होता. या प्रकल्पाच्या निविष्टा किट अंतर्गत जे.एस.९५६० या वाणाच्या सोयाबीन बियाणांचा पुरवठा राष्ट्रीय बीज निगम लि.पुसा, नवी दिल्ली यांच्याकडून करण्यात आला होता. सदर बियाणे सदोष असल्याचे तपासणीत आढळून आलेले आहे.

तथापि मौजे जुनूना, ता.वसमत येथे कृषि विभागाकडून बियाणे वाटप करण्यात आलेले नाही.

(२) होय.

उप विभागीय कृषि अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील तालुका तक्रार निवारण समितीने क्षेत्रिय पाहणी व तपासणी करून सदर बियाणाची उगवण क्षमता कमी असल्याचा निष्कर्ष काढलेला आहे. त्यामुळे कंपनीस कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे.

(३) नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना राष्ट्रीय बीज निगमने दुबार पेरणीसाठी विनामुल्य बियाणे बदलुन दिलेले आहे.
(४) विलंब झालेला नाही.

-----------------

**अकोला जिल्हयातील सोयाबीन नुकसानग्रस्त शेतक-यांची महाबीज कर्मचारी पतसंस्थेकडून झालेली फसवणूक**

**(५) * ६४३१४ श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्हयातील सोयाबीन नुकसानग्रस्त शेतक-यांची ४८ लाख रूपयांपेक्षा जास्त रक्कम महाबीज कर्मचारी पतसंस्थेत जमा करुन तत्कालीन सचिव यांनी अपहार केला असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासदंर्भातील अंकेक्षण अहवालात तत्कालीन सचिव यांनी नातेवाईकांच्या नावावर लाखो रूपयांच्या ठेवी ठेवल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने या ठेवी जप्त करून, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना त्यांच्या रकमेचे तातडीने वाटप करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) अंशत: खरे आहे.
(२), (३) व (४) अकोला जिल्हयातील सोयाबीन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे महाबीज कर्मचारी पतसंस्थेमध्ये रु. १८.१८ लक्ष जमा करण्यात आले आहेत. त्यामुळे महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, मर्या. अकोला यांनी संस्थेच्या तत्कालीन सचिवांवर फौजदारी गुन्हा दाखल केला असून संबंधीत सचिव हा महामंडळाचा कर्मचारी असल्याने त्यास निलंबीत करण्यात आले आहे.

संस्थेचे तत्कालीन सचिवाच्या स्वत:च्या तसेच पत्नी व मुलाच्या नावावर सन २०१४-१५ व २०१५-१६ या कालावधीत १४.५१ लाख रुपयांच्या ठेवी ठेवण्यात आलेल्या असून पुर्वीच्या जुन्या ठेवी मिळुन एकुण रु. ४४ लाखांच्या ठेवी संस्थेत ठेवण्यात आलेल्या आहेत.

नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची उपरोक्त संस्थेमध्ये जमा करण्यात आलेली रक्कम सहाय्यक पोलीस निरिक्षक, सिव्हिल लाईन, अकोला यांच्या दि.४.४.२०१६ रोजीच्या पत्रानुसार राखुन ठेवण्यात आलेली असून सदर रक्कम संबंधीत शेतकऱ्यांना अदा करण्यात आलेली नाही.

संस्थेचे सन २०१४-१५ व २०१५-१६ चे शासकीय लेखापरिक्षण, विशेष लेखा परिक्षक, वर्ग-२ (पणन) अकोला यांच्यामार्फत सुरु आहे. तसेच सन २००९ - २०१४ या ५ वर्षातील शासकीय फेर लेखापरिक्षणाचे आदेश निर्गमित करण्यात आले असून त्यासाठी तत्कालीन जिल्हा विशेष लेखापरिक्षक, वर्ग-१, सहकारी संस्था, अकोला यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर शासकीय लेखापरिक्षण अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार जबाबदारी निश्चीत करुन पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**लातूर जिल्ह्यातील फळबागा वाचविण्यासाठी शासनाकडून शेतकऱ्यांना बिनव्याजी कर्ज मिळण्याबाबत**

**(६) * ५४३६५ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यात गेल्या चार वर्षापासून अवर्षणग्रस्त परिस्थिती निर्माण झाल्यामुळे एकूण ६ हजार ५०८ हेक्टर क्षेत्रापैकी फक्त ४०० हेक्टर वरील फळबागा जिवंत असून उर्वरीत ८४ टक्के क्षेत्रावरील फळबागा पाण्याअभावी मोडीत काढल्या असुन फळबागांचे क्षेत्र फक्त १६ टक्क्यांवर आले असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यातील शिरूर (अनंतपाळ), देवणी आणि जळकोट या तीन तालुक्यातील फळबाग क्षेत्र शून्यावर आले असून ४८२ हेक्टर वरील द्राक्षबागा आणि ३०२ हेक्टरवरील केळीचे क्षेत्र देखील मोडीत काढल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्ह्यातील काही शेतकऱ्यांनी या फळबागा वाचविण्यासाठी शासनाकडून बिनव्याजी कर्ज मिळावे यासाठी पाठपुरावा सुरु केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, फळबाग उत्पादक शेतकऱ्यांना बिनव्याजी कर्ज मिळावे यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) हे खरे नाही.लातूर जिल्हयामध्ये फळबागांखाली एकूण ६५०८ हेक्टर क्षेत्र असून त्यापैकी ९४४ हेक्टर क्षेत्र (१५ टक्के) अवर्षणामुळे वाळलेले आहे व ५५६४ हेक्टर क्षेत्र (८१ टक्के) फळबागा सध्या जिवंत आहेत.
(२) हे खरे नाही. शिरूर (अनंतपाळ),देवणी आणि जळकोट या तीन तालुक्यात सध्या फळपिकाखालील एकूण क्षेत्र ६७२ हेक्टर आहे. या तालुक्यामधील फळपिकांखालील क्षेत्रांपैकी द्राक्षपिकाखालील एकूण क्षेत्र ५.४० हेक्टर असून त्यापैकी अवर्षणामुळे २.४० हेक्टर वाळलेले आहे.केळीपिकाखालील एकूण क्षेत्र ४२.३८ हेक्टर असून त्यापैकी अवर्षणामूळे १२.८८ हेक्टर क्षेत्र वाळलेले आहे.
(३) लातूर जिल्हयातील एका शेतक-याचा अर्ज प्राप्त झालेला आहे.
(४) बिनव्याजी कर्ज देण्याची शासनाची कोणतीही योजना नाही. मात्र शेतकर्‍यांनी अल्प मुदतीच्या कर्जाची परतफेड विहीत मुदतीत केल्यास त्यांना व्याजदरामध्ये सवलत देण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयात कोट्यवधी रुपयांचा झालेला गैरव्यवहार

**(७) * ६४८६३ श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयात २०११-२०१३ या कालावधीत वाहतूक संवर्गातील वाहन नॉन ट्रान्सपोर्ट संवर्गात रुपांतरीत करताना शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडविल्याचे दिनांक २८ जून, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणात वाहनांची किंमत कमी दाखवून वाहतूक संवर्गातील वाहन नॉन ट्रान्सपोर्ट संवर्गात रुपांतरीत करताना एक रकमी भरावा लागणारा महसूल कमी भरण्यात आला असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईहून आलेल्या पथकाने या प्रकरणाचा तपास केला असून परिवहन आयुक्त कार्यालयास त्याचा अहवाल पाठविण्यात आला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्राप्त अहवालाच्या अनुषंगाने संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) हे खरे आहे.

जून, २०१३ मध्ये सदरची बाब निदर्शनास आल्यानंतर आक्षेपार्ह सर्व प्रकरणांची अंतर्गत लेखा परिक्षण पथकाद्वारे पडताळणी केली असता, वाहतूक संवर्गातील वाहन नॉन ट्रान्सपोर्ट संवर्गात रुपांतरित करताना शासनाच्या महसूलाचे नुकसान झाले असल्याबाबत निदर्शनास आले आहे.

(२) होय.

सद्यस्थितीत अंतर्गत लेखा परिक्षण विभागाचे अहवालानुसार एकूण ६६६ प्रकरणातील एकूण रक्कम रु.२,३६,३३,८२१/- कमी वसूल झाल्याचे दिसून येत आहे.

(३) परिवहन आयुक्त यांच्या दि.२३/०६/२०१६ च्या आदेशानुसार प्रादेशिक परिवहन अधिकारी, औरंगाबाद यांचे अध्यक्षतेखाली ३ सदस्यांची समिती गठीत करुन समितीने संपूर्ण प्रकरणाची पडताळणी करुन आपला अहवाल दि.२५/०६/२०१६ रोजी परिवहन आयुक्त यांना सादर केला आहे.

(४) सदर अनियमिततेबाबत संबंधित मोटार वाहन निरीक्षक / सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी / उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना जबाबदार धरुन त्यांचेविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ च्या तरतूदीनुसार विभागीय चौकशी का करु नये याबाबत नोटीस जारी करण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**खटाव (जि.सातारा) तालुक्यातील पिंगळी तलावातून गाळ काढण्याऐवजी वाळूची चोरी होत असल्याबाबत**

**(८) * ६१३८३ श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खटाव (जि.सातारा) तालुक्यातील पिंगळी तलावातील गाळ काढण्याचे काम सुरु असताना येथील वाळू ठेकेदार तलावातील गाळ काढत असल्याचे भासवून गाळ काढण्याऐवजी वाळूची चोरटी वाहतूक करीत असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने वाळूचोरी करणाऱ्या ठेकेदारांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**भंडारा व गोंदिया जिल्ह्यात विद्युत पारेषण कंपनीने शेतकऱ्यांच्या नाहरकत प्रमाणपत्राशिवाय विद्युत वाहिन्यांचे टॉवर उभे केल्याबाबत**

**(९) * ६३२८६ श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा व गोंदिया जिल्ह्यात महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीने शेतकऱ्यांकडून नाहरकत प्रमाणपत्र न घेता त्यांच्या जमिनीवर १३२ केव्ही विद्युत पुरवठा करणाऱ्या वाहिन्यांचे टॉवर उभे केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांच्या जमिनीवर जेव्हा पासून टॉवर उभारले तेव्हापासून शेतकऱ्यांना व्याजासहित मोबदला देण्याची कायद्यात तरतूद असतानाही अधिकाऱ्यांकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना विद्युत कायदा २००३ अंतर्गत कलम ६७/३ अन्वये नुकसान भरपाई देण्याबाबत व कलम ६७/४ अन्वये नुकसान भरपाई देण्यास विलंब लावणाऱ्या कंपनी व अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) ऊर्जा विभाग आदेश क्र. संकीर्ण-०६/ प्र.क्र.३१२/ऊर्जा-४, दिनांक २४.०८.२००६ नुसार टेलिग्राफ प्राधिकरणास भारतीय टेलिग्राफ कायदा १८८५, भाग-३ मध्ये उपलब्ध असलेले अधिकार महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीस देण्यात आलेले आहेत. त्यानुसार महापारेषण कंपनीतर्फे वाहिनी उभारणीपूर्वी सार्वजनिक अधिसूचना (Public Notification) व शासकीय अधिसूचना (Gazette Notification) व्दारे वाहिनीच्या मार्गाची सूचना देण्यात येते. तसेच वाहिनीचे काम करताना शेतकऱ्यांना आगाऊ सूचना देण्यात येते.

(२) व (३) मनोऱ्याने व्याप्त जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना / जमीनधारकांना शासन निर्णय ऊर्जा विभाग क्र. संकीर्ण-०२१०/प्र.क्र.२९/ऊर्जा-४ दि.०१.११.२०१० अनुसार देण्यात येतो. सदर शासन निर्णयात व्याजासहित मोबदला देण्याबाबत कोणतीही तरतूद नाही. मोबदल्याच्या रक्कमेचे मूल्यांकन संबंधित जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समितीकडून करण्यात येऊन समितीने निश्चित केल्यानुसार मोबदल्याची रक्कम देण्यात येते तसेच मनोऱ्याच्या पायथ्याचे, मनोरा उभारणीचे व तारा ओढण्याचे काम करताना शेतातील पिकांचे नुकसान झाल्यास त्या पीक नुकसानीचा मोबदला कृषि अधिकाऱ्यांकडून मूल्यांकन करुन देण्यात येतो.

(४) भंडारा व गोंदिया जिल्हयात मनोरा / वाहिनी उभारणीमुळे पिकांच्या नुकसान भरपाईसाठी अनुक्रमे २८० व ५० बाधित शेतकऱ्यांना अनुक्रमे एकूण रु. ५०,५५,६०४/- व रु. १९,६४,७९२/- एवढी रक्कम देण्यात आली आहे. तसेच या जिल्हयातील बाधित शेतकऱ्यांना मनोऱ्याने व्याप्त जमिनीचा मोबदला देण्याकरिता जमिनीचे मूल्यांकनासाठी बाधित शेतकऱ्यांची यादी संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडे महापारेषण कंपनीकडून पाठविण्यात आली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून बाधित शेतकऱ्यांच्या जमिनीचे मूल्यांकन प्राप्त

झाल्यानंतर, संबंधित शेतकऱ्यांना उपरोक्त दि.०१.११.२०१० च्या शासन निर्णयानुसार जमिनीचा मोबदला देण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नाथवडे (ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग) येथे तेलताड वृक्ष लागवडीच्या कामात झालेला गैरव्यवहार**

**(१०) * ५९४२६ श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाथवडे (ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग) गावात कृषि विभागांतर्गत ४२९ खड्यांमध्ये तेलताड वृक्ष लागवड केल्याचे कागदोपत्री दाखवून लागवडीसाठी कोल्हापूर येथील गोदरेज ॲग्रोव्हेट कंपनीकडून वृक्ष खरेदी करण्याची बनावट देयके तयार करुन लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नाधवडे गावातील ग्रामस्थांनी वैभववाडी कृषी विभागाच्या वरिष्ठ अधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार करुन चौकशी व कार्यवाही करावी अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार या गैरव्यवहारातील संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१), (२), (३) व (४) मौजे नाथवडे (ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग) येथील श्री.रामचंद्र तुकाराम भोगम व श्रीमती बाळाबाई रामचंद्र भोगम यांना अनुक्रमे ३ हेक्टर व १ हेक्टर क्षेत्रावर तेलताड लागवडीसाठी दिनांक ५.३.२०१५ रोजी तांत्रिक व दिनांक २०.३.२०१५ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. परंतु मंडळ कृषि अधिकारी यांनी दिनांक १३.४.२०१६ रोजी क्षेत्राची प्रत्यक्ष पाहणी केली असता तेलताडाची झाडे काढून टाकली असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे शेतकऱ्यांना किंवा कंपनीला अनुदान अदा करण्यात आलेले नाही.

परंतु प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने विभागीय कृषि सहसंचालक यांनी स्वत: चौकशी करावी असे आदेश देण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अंबरनाथ (जि.ठाणे) येथील नौदलाची जमीन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने परस्पर विकल्याबाबत**

**(११) * ६३८१३ डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबरनाथ (जि.ठाणे) येथील नौदलाच्या नौसेन सामग्री संशोधन प्रयोग शाळेच्या विस्तारासाठी महसूल विभागाने दिलेली साडे अकरा हेक्टर कोट्यवधी रुपये किंमतीची जमीन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी खाजगी उद्योजकांना परस्पर विकल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आल्याने महसूल विभागाने या विक्रीवर आक्षेप घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने जमिनीची बेकायदेशीर विक्री करणाऱ्या औदयोगिक विकास महामंडळाच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**(उत्तर आले नाही.)**

-----------------

**भामा आसखेड धरण (जि.पुणे) प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(१२) * ६२४०७ श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भामा आसखेड धरण (जि.पुणे) प्रकल्पातील १४१४ प्रकल्पग्रस्तांपैकी १११ प्रकल्पग्रस्तांनी पर्यायी जमिनी मिळणेबाबत ६५% रक्कम कपात करून दिली असून उर्वरित १३०३ खातेदारांनी पर्यायी जमीन मिळणेबाबत ६५% रक्कम कपात करून दिलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्वरित १३०३ खातेदारांचे ६५% रक्कम भरून घेऊन पुनर्वसन करावे याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. महसूल मंत्री यांना माहे मार्च, २०१६ वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, भामा आसखेड धरण प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करणेबाबत मा.मुख्यमंत्री यांच्यासोबत दि.१३/५/२०१६ रोजी झालेल्या बैठकीनुसार जिल्हाधिकारी, पुणे यांनी शासन निर्णय डब्लूएलपी-१०१२/प्र.क्र.१२२/फ१ दि.३/११/२०१२ अन्वये दि.२६/५/२०१६ रोजी वा त्यासुमारास प्रचलित कायद्यानुसार जमिनीचा मोबदला देण्याबाबतचा “खास बाब” असा प्रस्ताव पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रस्तावास मान्यता देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) होय

(३) होय.

(४) जिल्हाधिकारी, पुणे यांच्या दिनांक २६.५.२०१६ च्या पत्रान्वये या विभागास प्राप्त झालेला सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील फळ उत्पादक शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तीपासून मिळणारा पिक विमा अद्याप विमा कंपनीकडून मिळाला नसल्याबाबत

**(१३) * ५९०५३ श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.बळीराम सिरसकर (बाळापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील फळ उत्पादक शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तीपासून मिळणारा फळ पिक विमा अद्याप विमा कंपनीकडून मिळाला नसल्याबाबतची बाब माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर जिल्ह्यातील कृषी विभागाच्या आकडेवारीनुसार सन २०११-१२ या वर्षात एकूण १० हजार २६९ शेतक-यांनी ६ कोटी ८१ लाख तर सन २०१५-१६ या वर्षात एकूण ३३४६ शेतक-यांनी २ कोटी १० लाखाचा विमा हप्ता विमा कंपनीकडे जमा केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सन २०११-१२ व २०१५-१६ या वर्षातील फळपिक विमा शेतकऱ्यांना न देण्याऱ्या विमा कंपनीवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) हे अंशतः खरे आहे.

सन २०१५-१६ मधील मृग बहारांतर्गत एकूण १३०५० शेतकर्‍यांनी सदर योजनेचा एकूण १३९७२ हेक्टर क्षेत्राचा विमा काढला आहे. त्यापैकी २९४२ शेतकर्‍यांना रु. ४१८ लाख रकमेची नुकसान भरपाई वितरीत करण्यात आलेली आहे.

सन २०१५-१६ मधील आंबिया बहारांतर्गत द्राक्ष, पेरू, काजू, संत्रा, आंबा व डाळींब या फळपीकांचा विमा संरक्षण कालावधी माहे मे २०१६ अखेर आहे. त्यासाठी रु. ६७ कोटी इतकी रक्कम विमा कंपनीमार्फत लवकरच अदा करण्यात येईल.

केळी फळपिकाचा विमा संरक्षित कालावधी ३१ जुलै, २०१६ व मोसंबी या फळपीकाचा विमा संरक्षित कालावधी १५ सप्टेंबर, २०१६ अखेर आहे.

(२) होय.

(३), (४) व (५) सन २०११-१२ मध्ये नागपूर जिल्ह्यामध्ये कळमेश्वर, काटोल, नरखेड आणि सावनेर या तालुक्यातील एकूण १०,२६९ शेतकर्‍यांनी सदर योजनेचा एकूण ९४६६ हेक्टर क्षेत्राचा विमा काढला होता. त्यापैकी १६७१ शेतक-यांना रु. २६० लाख रकमेची नुकसान भरपाई वितरीत करण्यात आलेली आहे.

सन २०१५-१६ मधील मृग बहारांतर्गत नागपूर जिल्ह्यातील ३३४७ शेतक-यांनी ३३५२ हेक्टर क्षेत्राचा विमा काढला होता. त्यासाठी एकूण विमा हप्ता रक्कम रु. २११ लाख आहे. मृग बहार हंगामासाठी नागपूर जिल्ह्यामध्ये संत्रा व मोसंबी या फळ पीकांसाठी हवामान केंद्रांच्या आकडेवारीनुसार शेतकर्‍यांना नुकसानभरपाई देय झाली नाही.

आंबिया बहारात नागपूर जिल्ह्यातील १९१ शेतक-यांनी १८४ हेक्टर क्षेत्राचा विमा काढला आहे. दि. ०३.१२.२०१५ च्या शासन निर्णयानुसार संत्रा पिकाचा विमा संरक्षण कालावधी ३१ मे, २०१६ रोजी पर्यंत होता. त्यासाठी रु. २१ लाख इतकी रक्कम विमा कंपनीमार्फत लवकरच अदा करण्यात येईल. तसेच मोसंबी फळपीकाचा विमा संरक्षण कालावधी १५ सप्टेंबर, २०१६ पर्यत असून सदर फळपीकाची नुकसान भरपाई त्यानंतर निश्चित करण्यात येईल.

-----------------

## मावळ (जि.पुणे) तालुक्यात मुंबई - पुणे द्रुतगती मार्गावर अनधिकृत बस थाब्यांमुळे झालेले अपघात

**(१४) * ६४४१० श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मावळ (जि.पुणे) तालुक्यातील मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गावर मनशक्ती केंद्र व मुनीर हॉटेल दरम्यान असलेल्या अनधिकृत बस थांब्यामुळे गेल्या महिनाभरात येथील एनएच ४ फूडमॉल समोर झालेल्या तीन अपघातांमध्ये दोघांचा मृत्यु झाला असून दोन जण गंभीर जखमी झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाबाबत रस्ते विकास महामंडळ, आयआरबी कंपनी व विभागीय नियंत्रक राज्य परिवहन महामंडळास निवेदनही देण्यात आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या निवेदनाच्या अनुषंगाने सदरहू अनधिकृत बस थांबे बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) हे खरे नाही.

गेल्या महिन्यामध्ये राज्य परिवहन बसचा एनएच-४ फूडमॉल समोर एकही अपघात झालेला नाही. तथापि, माहे एप्रिल महिन्यात दि. २५/०४/२०१६ रोजी सातारा - दादर मार्गावरील राज्य परिवहन बस क्र. एमएच-२०-बीएल-२४२७ लोणावळा येथील हॉटेल एनएच-४ जवळ प्राणांतिक स्वरुपाचा अपघात झाला होता.

(२) होय.

एन.एच. ४ व सेंटर पॉईन्ट या खाजगी हॉटेलवर महामंडळाच्या बसेस अनधिकृतपणे थांबत असल्याचे निवेदन राज्य परिवहन महामंडळास प्राप्त झाले आहे.

(३) मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर रा.प. चे बसस्थानक नसल्याने राज्य परिवहन महामंडळाच्या नियमानुसार १० मिनिटे चहा-फराळ/नैसर्गिक गरजेकरिता निवडक बसेसना एन.एच.४ व सेंटर पॉईंट या दोन हॉटेल ठिकाणी थांबे देण्यात आलेले आहेत. वातानुकूलित व निमआराम बसेस वगळता ज्या बसेसना थांबा देण्यात आलेला नाही, अशा बसेसना सदर बस थांब्यावर बसेस न थांबविण्याबाबतच्या सूचना राज्य परिवहन महामंडळाद्वारा देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**धामणगांव रेल्वे (जि.अमरावती) तालुक्यातील स्थलांतरीत करण्यात आलेल्या पुनर्वसित कुटूंबांना जागेचे पट्टे देण्याबाबत**

**(१५) * ६४५५७ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धामणगांव रेल्वे (जि.अमरावती) तालुक्यात सन १९९४ मध्ये आलेल्या महापुरामुळे दत्तापूर, धामणगांव रेल्वे (आठवडी बाजार) येथून जळगांव, आर्वी येथे स्थलांतरीत करण्यात आलेल्या पुनर्वसित कुटूंबांना राहत्या जागेचे कायम पट्टे देण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी उपविभागीय अधिकारी, चांदूर रेल्वे यांना दिनांक १९ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने पुनर्वसित कुटूंबाना राहात्या जागेचे पटटे देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) अमरावती जिल्ह्यातील मौजे दत्तापूर ता. धामणगाव रेल्वे येथील चंद्रभागा नदिला दि. १२.०७.१९९४ रोजी आलेल्या पुरामुळे बाधीत झालेल्या २१

कुटूंबांना मौजा दत्तापूर येथे तात्पूरत्या स्वरुपात दि.०७.११.१९९४ पर्यंतच्या मुदतीसाठी अस्थायी स्वरूपात गाळे देण्यात आले होते. सदर कुटूंबाना शासनामार्फत जळगाव, आर्वी येथे स्थलांतरीत करण्यात आलेले नाही. त्यामुळे सदर बाधीत कुटूंबांना कायमस्वरूपी पट्टे देण्याचा प्रश्न उदभवत नाही. तथापि सदर कुटूंबांचे पुनर्वसन करण्याची आवशकता आहे किंवा कसे, याबाबत जिल्हाधिकारी अमरावती यांचे कडून चौकशी करुन अहवाल प्राप्त करुन त्यानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**खालापूर (जि.रायगड) तालुक्यातील प्रस्तावित एम.आय.डी.सी. रद्द करण्याबाबत**

**(१६) * ५४८८३ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) खालापूर (जि.रायगड) तालुक्यातील ९ गावे प्रस्तावित नावडे एम.आय.डी.सी.साठी संपादीत करण्यात येत असलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनीवरील ७/१२ मध्ये पेन्सिलने नोंदी करण्यात आल्या असून याबाबत शेतकऱ्यांचा ७/१२ कोरा करण्यासंबंधी ९ गांव संघर्ष समितीने जिल्हाधिकारी रायगड यांना माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.उद्योग मंत्री यांनी दिनांक ४ एप्रिल, २०१६ रोजी ९ गांव संघर्ष समिती सोबत घेतलेल्या बैठकीत सदर प्रस्तावित एम.आय.डी.सी. रद्द करण्याचे आश्वासन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय, हे खरे आहे.

शेतजमिन बचाव समिती, खालापूर यांनी ७/१२ वरील नोंदी रद्द करण्याबाबत दिनांक २६/११/२०१५ च्या निवेदनाद्वारे दि.०२/०१२/२०१५ रोजी तहसिल कार्यालय खालापूर येथे मोर्चा आयोजित केल्याचे निवेदन दिले होते. तसेच दिनांक ११/१२/२०१५ रोजी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या विरोधात लाक्षणिक उपोषण केले होते. तथापि माहे एप्रिल २०१६ मधील कोणतेही निवेदन अद्याप महामंडळास प्राप्त झालेले नाही.

(२) व (३) दि.५ एप्रिल २०१६ रोजी मा.मंत्री (उद्योग) यांच्याकडे ९ गाव संघर्ष समिती सोबत झालेल्या बैठकीत सदर क्षेत्राच्या भूसंपादनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली असून संबंधित खातेदारांच्या संमतीनेच भूसंपादनाची पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नाशिक जिल्हयात जिल्हाधिकाऱ्यांच्या सही शिक्क्यांचे खोटे नियुक्तीपत्र देऊन फसवणूक केल्याबाबत**

**(१७) * ६४०८५ श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदगाव, निफाड, सिन्नर, मालेगाव व इगतपूरी (जि.नाशिक) या पाच तालुक्यातील प्रांत अधिकारी व तहसील कार्यालयात लिपिक पदासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या सही शिक्क्यांचे खोटे नियुक्तीपत्र देऊन अनेक बेरोजगार युवकांची फसवणूक केल्याचा प्रकार माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने खोटे नियुक्त पत्र देवून बेरोजगार तरूणांची व शासनाची फसवणूक करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय.
(३) सदर प्रकरणी इगतपूरी, मालेगांव, येवला, नांदगांव, निफाड पोलीस स्टेशनमध्ये भा.दं.वि.कलम ४२०, ४६४, ४६५, ४६८, ४७१, ४७३, ४७४, ३४ प्रमाणे आरोपीतांविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. सदर गुन्हयात एकूण १० आरोपींना अटक करण्यात आलेली असुन गुन्हयाचा तपास चालु आहे.
(४) विलंब झालेला नाही.

-----------------

**मौजे डोंगरगाव (ता.मोहाडी, जि.भंडारा) येथील टेकड्यांवर अवैधरित्या दगड उत्खनन होत असल्याबाबत**

**(१८) * ६३८५२ श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे डोंगरगांव (ता.मोहाडी, जि.भंडारा) येथील टेकडयांवर अवैधरित्या दगड उत्खनन सुरु असल्याचे दिनांक ३१ मार्च २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने टेकडयांवर अवैधरित्या दगड उत्खनन करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मंगरुळ-दस्तगीर (ता.धामणगांव रेल्वे, जि.अमरावती) येथे रेतीच्या ट्रकने झालेला अपघात**

**(१९) * ६२४९२ डॉ.सुनिल देशमुख (अमरावती), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगरुळ-दस्तगीर (ता.धामणगाव रेल्वे, जि.अमरावती) येथे दिनांक १७ जून, २०१६ रोजी रेतीच्या ट्रकने झालेल्या अपघातात हरिचंद्र सिताराम कांबळे व राहूल हरिचंद्र कांबळे यांचा जागीच मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामस्थांनी बोरगाव निस्ताने येथील रेतीघाट बंद होणार नाही तोपर्यंत मृतदेह उचलणार नाही अशी भूमिका घेतली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अवैध रेती उपसा करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत, सदरचा रेतीघाट बंद करण्याबाबत व अपघातात मृत्यू झालेल्यांच्या कुटूंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) सदर अपघात रेती ट्रक ड्रायव्हरच्या चुकीमुळे घडल्याचे निष्पन्न झाले असून, त्याच्याविरुध्द मंगरुळ-दस्तगीर पोलीस ठाणे येथे अप.मृ. ११८/२०१६, भा.दं.वि.सं. कलम २७९, ३०४ (अ) सह मो. वा. का. कलम १३४ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

अवैध रेती उपसा करणाऱ्या ठेकेदारास अवैध रेती उपसा केल्याबद्दल रु. १०,६०,८००/- एवढ्या दंडाची आकारणी करण्यात आली आहे. तसेच, मौजा बोरगाव निस्ताने या रेती घाटाचा सन २०१५-२०१६ या वर्षाकरीता मंजूर करण्यात आलेला लिलाव रद्द करण्यात आला आहे.

रस्ते अपघातात मृत्यू झालेल्यांना शासकीय मदत देण्याची तरतूद नाही. तथापि, मोटार अपघात दावा न्यायाधिकरणात नुकसान भरपाई दावा दाखल करण्याकरीता आवश्यक ती कागदपत्रे पुरविण्यात आलेली आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुलुंड कॉलनी (प), मुंबई येथील शासकीय जागेवरील अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत

**(२०) * ५३६६६ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुलुंड कॉलनी (प), मुंबई येथील शासकीय जागेवर अतिक्रमण केले असल्याचे व्यवस्थापकीय अधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांनी दिनांक १९ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने महसूल विभागाने जिल्हाधिकारी उपनगर यांना दिनांक २८ जानेवारी २०१६ रोजी वा त्यासुमारास सदर अतिक्रमण निष्कासित करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अतिक्रमणास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर व शासकीय जागेवर अतिक्रमण करणाऱ्यांवर शासनाने कोणती

कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व्यवस्थापकीय अधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांनी दिनांक १९/११/२०१५ किंवा त्यासुमारास शासनाकडे तक्रार केलेली नाही. तथापि, लोकप्रतिनिधींनी दिनांक ४/११/२०१५ च्या पत्रान्वये तक्रार केली आहे.
(२) लोकप्रतिनिधींनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करुन उचित कार्यवाही करण्याच्या सुचना दि.२८/१/२०१६ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना दिल्या आहेत.
(३), (४) व (५) तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी सुरू आहे.

-----------------

## वाशिम जिल्हयातील कृषि सेवा केंद्र खते व बियाण्यांच्या किंमतीचे दरपत्रक लावत नसल्याबाबत

**(२१) * ६२१२६ श्री.अमित झनक (रिसोड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम जिल्हयात खरीप हंगामासाठी विविध प्रकारची रासायनिक खते व बी-बियाणे शेतकरी खरेदी करीत असून या खते व बियाण्यांच्या किंमतीचे दरपत्रक न लावता अनेक कृषि सेवा केंद्र शेतकऱ्यांची फसवणूक करीत असल्याचे माहे जून, २०१६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांची फसवणूक करणा-या कृषिसेवा केंद्रांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) अशा प्रकारची बाब निदर्शनास आलेली नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राष्ट्रीय केमिकल ॲन्ड फर्टिलायझरच्या खतांचा शेतकऱ्यांना पुरवठा व्यवस्थित करण्याबाबत

**(२२) * ६३८८७ श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय केमिकल ॲन्ड फर्टिलायझरच्या (आरसीएफ) खत वाहतूकीच्या निविदा खरीप हंगाम आला तरी गेल्या ९ महिन्यापासून उघडल्या नसल्याने राज्यातील शेतकऱ्यांना खत खरेदी करण्यात अडचणी निर्माण झाल्या असल्याची बाब माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने आरसीएफच्या युरिया १५-१५-१५, २०-२०-००, पोटॅश, डीएपी, सुपर फॉस्पेट या खतांचा शेतकऱ्यांना पुरवठा व्यवस्थितपणे करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१), (२), (३) व (४) राष्ट्रीय केमिकल्स ॲन्ड फर्टिलायझर्स ही केंद्र शासनाच्या अखत्यारीतील कंपनी आहे. खत वाहतुकीच्या निविदा काढण्याची बाब त्या कंपनीचा कामाचा भाग आहे.

केंद्र शासनाने दिलेल्या आवंटनाच्या तुलनेत १ एप्रिल, २०१६ ते १७ जुलै २०१६ पर्यंत राष्ट्रीय केमिकल्स ॲन्ड फर्टिलायझर्सकडून यूरिया ८९ %, संयुक्त खते (१५-१५-१५, २०-२०-००) ८७ % व एमओपी ७०% या प्रमाणे खतांचा पुरवठा महाराष्ट्र राज्याला करण्यात आलेला असून खत उपलब्धतेबाबत अडचणी उद्भवण्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

-----------------

## आष्टे (ता.पनवेल, जि.रायगड) गावातील शासकीय गुरचरण जागेत अनधिकृतपणे बांधकाम केल्याबाबत

**(२३) * ६२४१८ श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आष्टे (ता.पनवेल, जि.रायगड) गावातील सर्वे नं.८५/१ या शासकीय गुरचरण जागेत अनधिकृतपणे हॉटेल्स व कार्यालय बांधल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक नागरीकांनी याबाबत जिल्हाधिकारी, प्रांत अधिकारी व तहसीलदार, रायगड यांना पत्रव्यवहार करुन सदर बाब प्रशासनाच्या निदर्शनास आणली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत व बांधकाम निष्कासित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे.

(४) व (५) ग्रामपंचायत कळसखेड हद्दीमध्ये मौजे आष्टे येथील स.नं.८५/१ या गुरचरण जमिनीमध्ये श्री अनिल अनंता पाटील, उपसरपंच यांनी अतिक्रमण केले आहे. ग्रामसेवक, ग्रामपंचायत कळसखेड यांनी सदर अतिक्रमणधारक यांना दि.२९.६.२०१६ रोजी नोटीस दिली आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम ५३ अन्वये ३० दिवसाच्या आत सदर बांधकाम काढून टाकण्याची अंतिम नोटीस दि.२२.७.२०१६ रोजी दिली असून सदर नोटीशीची मुदत संपताच ग्रामपंचायतीमार्फत सदर अतिक्रमणाच्या निष्कासनाची कार्यवाही करण्यात येणार आहे. तसेच सदर गायरान जमिनीमध्ये श्री. अनिल अनंता पाटील, उपसरपंच यांनी अतिक्रमण केलेले असल्याने महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील तरतूदींनुसार पुढील कार्यवाही करणेबाबत संबंधित जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड यांना कळविण्यात आले आहे.

-----------------

**राधानगरी (जि. कोल्हापूर) तालुक्यातील तुळशी धरण परिसरात बेकायदेशीररित्या दगड उत्खनन सुरु असल्याबाबत**

**(२४) * ६३२५७ डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राधानगरी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील तुळशी धरण परिसरात दगड उत्खनन करण्यास मनाई असतांनाही धरणाच्या ३०० फुट अंतरावर बेकायदेशीररित्या दगड उत्खनन सुरु असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दगड उत्खनन करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विंलबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) केळोशी लघु पाटबंधारे प्रकल्पाच्या उर्वरित अश्मपटलाच्या कामासाठी लागणाऱ्या दगडाची वाहतुक तुळशी प्रकल्पासाठी संपादित केलेल्या मौजे बुरंबाळी येथील गट क्र. १६८ मधून करण्यात आली आहे. सदर ठिकाण तुळशी धरणाच्या पायथ्यापासून २०० मी. अंतराबाहेर आहे. सदर उत्खननाकरीता मुख्य अभियंता जलसंपदा विभाग पुणे यांची मान्यता घेण्यात आली असुन, सदर उत्खनन जलसंपदा विभागाच्या दिनांक ०२/०८/२०१३ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार आहे. सदर उत्खननापोटी देय स्वामित्वधनाची रक्कम संबंधित कंत्राटदाराच्या देयकातून वसूल करुन शासनास जमा करण्याचे नियोजित आहे.

-----------------

### राज्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटूंबांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(२५) * ५८२२३ श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गेल्या १५ वर्षात झालेल्या २० हजार ८७३ शेतकरी आत्महत्यांपैकी १० हजार ३९० शेतकऱ्यांच्या आत्महत्या शासनाच्या मदतीचे सर्व निकष पूर्ण

करत असतानाही त्या अपात्र ठरविण्यात आल्या असल्याचे माहे मार्च, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने आत्महत्या करणा-या शेतकऱ्यांच्या कुटूंबांना आर्थिक मदत देण्याबाबत तसेच शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) जिल्हास्तरीय समितीकडून चौकशी करुन आत्महत्येच प्रकरण पात्र/अपात्र ठरविण्यात येते.

(३) पात्र आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटूंबाला शासनाकडून दिनांक २३/०१/२००६ च्या शासन निर्णयान्वये रुपये एक लाख मदत दिली जाते.

शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी शासनाकडून विविध उपाययोजना व उपक्रम राबविले जातात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**प्रादेशिक परिवहन महामंडळाच्या वर्धा विभागात**
**साहित्य खरेदीत झालेला गैरव्यवहार**

**(२६) * ५८०६७ श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रादेशिक परिवहन महामंडळाच्या वर्धा विभागात साहित्य खरेदीत गैरव्यवहार झाल्याचे नागपूर विभागीय कार्यालयाने केलेल्या चौकशीत माहे मार्च, २०१६ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आल्याने, प्रादेशिक व्यवस्थापकांनी विभागीय पुरवठा अधिकारी व विभागीय लेखा अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस पाठविली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वर्धा विभागातील सेवाग्राम येथे वाहनांचे सुटे भाग खरेदी करण्यात गैरव्यवहार झाल्याच्या तक्रारीनुसार न्यायालयाच्या निर्देशानंतर चार अधिकाऱ्यांसह एका लिपिकावर माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये सेवाग्राम पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्याचा तपास पूर्ण झाला आहे काय, व

त्याचे निष्कर्ष काय आहेत,

(३) असल्यास, या प्रकरणांची शासनाने चौकशी करुन संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) प्रादेशिक व्यवस्थापक, रा.प.नागपूर यांनी विभागीय भांडार अधिकारी व विभागीय लेखा अधिकारी यांना आरोपपत्र दिले असून त्यांचेवर प्रादेशिक व्यवस्थापक, रा.प.नागपूर यांचेमार्फत प्रमादीय कारवाई सुरु आहे.
(२) व (३) श्री.प्रल्हाद तिडके, प्रमुख कारागिर यांचे तक्रारीवरुन मा. जिल्हा न्यायालय-१ आणि ए.एस.जे.वर्धा यांचे आदेशान्वये श्री.व्ही.टी.गव्हाळे, विभाग नियंत्रक, श्री.आर.के.चौरसिया सेवानिवृत, विभागीय वाहतूक अधिकारी, श्री.अशोक वाडीभस्मे, विभागीय वाहतूक अधिक्षक, श्री. राजू करपते, वरिष्ठ लिपिक रा.प. वर्धा, श्री.व्ही.व्ही.माहुरे,सुरक्षा व दक्षता अधिकारी रा.प.वर्धा यांचेवर सेवाग्राम पोलीस स्टेशन, वर्धा येथे गुन्हा क्र. १६०/२०१६ दि.२२/२/२०१६ नुसार भा.दं.वि.क्र.१२० ब, ४२०, ४६८, २०१, ५०४, ५०६, ३४ व आर डब्ल्यू-३ (१) (२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस स्टेशन सेवाग्राम, वर्धा यांच्याकडे सदर गुन्ह्याचे अन्वेषण सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्ह्यात अवैध वाळू उपसा होत असल्याबाबत

**(२७) * ५७५३८ श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आजरा, चंदगड, गडहिंग्लज, कागल, राधानगरी, भूदरगड व शिरोळ (जि.कोल्हापूर) तालुक्यात मोठ्या प्रमाणात वाळू उपसा होत असून नागरीकांना गढूळ पाणी पुरवठा होत असल्याने नागरीकांच्या आरोग्यावर परिणाम होत

असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ च्या मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने रेती उपसा करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशा आशयाच्या तक्रारी भुदरगड तालुक्यात व शिरोळ तालुक्यात एप्रिल २०१६ व मे २०१६ मध्ये प्राप्त झाल्या होत्या.
(२) व (३) सदर तक्रारीबाबत चौकशी केली असता, शिरोळ तालुक्यातील तक्रारीमध्ये तथ्य आढळून आले नाही. मात्र, भूदरगड तालुक्यातील वेदगंगा नदीपात्रात ज्यावेळी पाण्याची पातळी कमी असते त्यावेळी वाळू उपसा केल्यास नदीपात्रात पाणी गढूळ होत असल्याचे निदर्शनास आल्यावरुन संबंधित लिलावधारक यांना वाळू उपसा बंद करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. तदनुसार वाळू उपसा थांबल्यानंतर परत दुषित पाण्याविषयी तक्रारी प्राप्त झाल्या नाहीत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नायगांव (जि.नांदेड) तालुक्यात महसूल विभागाने जप्त केलेल्या रेती साठ्यात झालेला गैरव्यवहार

**(२८) * ६४८५४ श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नायगांव (जि.नांदेड) तालुक्यातील मनुर येथील रेती घाटातून उत्खनन करुन मनुर व रुई शिवारात अनधिकृतरित्या साठवेला ७७७० ब्रास साठा सन २०१३-१४ मध्ये महसूल विभागाने जप्त केला असल्याचा अहवाल नायगांव तहसीलदार यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हाधिकारी यांना अहवाल पाठविल्यानंतर लिलावधारक, तहसीलदार, मंडळ अधिकारी व तलाठी यांच्या संगणमताने ५५५० ब्रास रेतीची परस्पर विल्हेवाट लावण्यात येऊन मर्जीतील सार्वजनिक बांधकाम विभागाचे

कनिष्ठ अभियंता यांच्या मार्फत मोजमाप काढून तहसीलदार यांना हवा तसा अहवाल दिनांक १ सप्टेंबर, २०१५ रोजी बनवून घेवून जिल्हाधिकाऱ्यांना १९९२.५० ब्रास रेती साठा शिल्लक असल्याचा अहवाल पाठवून ४० ते ४५ लाखाच्या रेतीचा अपहार केला असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषी असणाऱ्या लिलावधारक, तहसीलदार, मंडळ अधिकारी व तलाठी यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) तहसिलदार, नायगांव यांनी दिनांक २९/०४/२०१४ रोजी ७,७७० ब्रास अनधिकृत रेतीसाठा जप्त केल्याचा अहवाल उपविभागीय अधिकारी, बिलोली यांना सादर करुन, त्याची प्रत जिल्हाधिकारी नांदेड यांना सादर केली होती.

जिल्हाधिकारी नांदेड यांनी जप्त वाळूसाठ्याच्या लिलावाबाबत दिनांक ३१.०७.२०१५ च्या परिपत्रकान्वये दिलेल्या सूचनानुसार, नायब तहसिलदार (म-२), शाखा अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग नायगांव, मंडळ अधिकारी, बरबडा व कुंटुर व तलाठी यांच्यामार्फत दिनांक १.०९.२०१५ रोजी वर नमूद जप्त रेतीसाठ्याची मोजणी केली असता, त्यामध्ये १९९२.५० ब्रास वाळूसाठा आढळून आला.

प्रश्न भाग -२ मध्ये नमूद आशयाची तक्रार मार्च, २०१६ मध्ये प्राप्त झाली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी, बिलोली यांनी गठीत केलेल्या पथकामार्फत उक्त जप्त वाळूसाठ्याची दिनांक ०८/०५/२०१६ रोजी पुन्हा मोजणी केली असता उक्त वाळूसाठा १९४७.६७ ब्रास आढळून आला.

संबंधित तलाठी यांनी उक्त साठ्यातून वाळू चोरी जात असल्याबाबत वेळोवेळी सादर केलेल्या अहवालानुसार संबंधितांविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तथापि, प्रस्तुत प्रकरणी उपविभागीय अधिकारी, बिलोली यांच्यामार्फत केलेल्या चौकशीत लिलावधारक, तहसिलदार, मंडळ अधिकारी व तलाठी यांच्या संगनमताने सदर रेती साठ्याची परस्पर विल्हेवाट लावल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पिक विमा योजनेसाठी भरलेली रक्कम न मिळाल्याबाबत

**(२९) * ५५२२९ श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील सन २०१५-१६ मध्ये खरीप हंगामामध्ये ९५ हजार ४०३ शेतक-यांनी व रब्बी हंगामामध्ये १ लाख ७५ हजार शेतक-यांनी पिक विम्यासाठी ६ कोटी इतकी रक्कम भरली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खरीप व रब्बी हंगामातील पावसाअभावी पिके नष्ट होऊनही शेतक-यांना दिनांक ८ जून, २०१६ पर्यंत पीकविम्याची रक्कम मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शेतक-यांना पिक विम्याची रक्कम मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) सोलापूर जिल्हयात राष्ट्रीय कृषि विमा योजना खरीप २०१५ मध्ये १.१० लाख शेतकऱ्यांनी सहभाग घेवून रु ३.५४ कोटी इतका विमा हप्ता भरणा केला होता. तर रब्बी २०१५-१६ मध्ये १.९१ लाख शेतकऱ्यांनी सहभाग घेवून रु. ४.४३ कोटी इतका विमा हप्ता भरणा केला होता.

(२) राष्ट्रीय कृषि विमा योजना खरीप हंगाम २०१५ मध्ये सोलापूर जिल्हयातील सहभागी १.१० लाख शेतकऱ्यांपैकी ७५ हजार शेतकऱ्यांना रु. ५४.३७ कोटी नुकसान भरपाई भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत मंजूर करण्यात आली असून दि. २७ ते ३१ मे, २०१६ या दरम्यान नुकसान भरपाईची रक्कम संबंधित बँकांकडे भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत जमा करण्यात आली आहे.

राष्ट्रीय कृषि विमा योजनेअंतर्गत रब्बी हंगाम २०१५-१६ ची नुकसान भरपाई निश्चित करण्याची कार्यवाही भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात ठिबक सिंचनाद्‌वारे शेती करणारे शेतकरी**
**अनुदानापासून वंचित असल्याबाबत**

**(३०) * ५९३७२ श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकरी दुष्काळाचा सामना करत असताना उपलब्ध पाण्यावर ठिबक सिंचनाद्‌वारे शेती करणारे ७१ हजार शेतकरी ठिबक सिंचनाच्या अनुदानापासुन वंचित असल्याची बाब माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात २३ जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या राष्ट्रीय ठिबक सिंचन अभियानांतर्गत सन २०१३-१४ मध्ये १ लाख ८० हजार १५३ शेतकऱ्यांनी अनुदानासाठी ऑनलाईन अर्ज दाखल करुन ३३० कोटी रूपयांची मागणी केली असता त्यापैकी २३१ कोटी रूपये मंजूर करण्यात आलेले असून अद्‌याप ९९ कोटी रूपये प्रलंबित असताना अनुदान वाटप न झालेल्या जिल्ह्यात प्रामुख्याने सतत अवर्षणग्रस्त असलेल्या उस्मानाबाद, लातूर तर सोलापूर जिल्ह्यातील सर्वाधिक १३ हजार ८३९ शेतकऱ्यांचा यामध्ये समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत सन २०१५-१६ या वर्षासाठी पुणे जिल्ह्यातील ६२०० शेतकरी पात्र असून पात्र लाभार्थीपैकी ३७२४ लाभार्थ्यांनाच अनुदान उपलब्ध होणार असल्याने उर्वरित २४७६ लाभार्थ्यांना अनुदानाअभावी प्रस्ताव परत करण्याचे आदेश मा. संचालक, फलोत्पादन, कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी माहे जून, २०१६ मध्ये वा त्यासुमारास दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबतची चौकशी करुन शेतकऱ्यांना त्वरीत अनुदान मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) व (२) सन २०१३-१४ या वर्षात राज्यातील १,७०,५८२ शेतकऱ्यांचे प्रस्ताव प्राप्त झाले. या योजनेसाठी राज्य शासनाने सन २०१५-१६ या

वर्षात, रु.३३४.०८ कोटी एवढा निधी कृषि आयुक्तालयास उपलब्ध करुन दिला. सदर निधी १०९०८३ लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात आला आहे. परंतु ६१,४९९ शेतकऱ्यांचे रु.१२९.५२ कोटी रकमेचे प्रस्ताव प्रलंबित आहेत. यामध्ये उस्मानाबाद, सोलापूर व लातूर या जिल्ह्यातील रु.४६.९३ कोटी रकमेच्या १९०३८ एवढया प्रस्तावाचा समावेश आहे.

निधी उपलब्धतेनुसार सदर प्रस्तावांवर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) व (४) सुक्ष्म सिंचनाचे प्रस्ताव ऑनलाईन स्वीकारण्यात येतात व उपलब्ध निधीच्या मर्यादेत प्राथम्य क्रमानुसार पूर्वसंमती देण्यात येते. पूर्वसंमती दिलेल्या ज्या शेतकऱ्यांनी सुक्ष्म सिंचन संचाची उभारणी करुन अनुदानासाठी प्रस्ताव सादर केला आहे असेच शेतकरी अनुदानासाठी पात्र ठरतात. त्यानुसार सन २०१५-१६ या वर्षात पुणे जिल्ह्यात ६१६९ प्रस्ताव प्राप्त झाले. त्यापैकी उपलब्ध निधीच्या मर्यादेत ३९५८ लाभार्थ्यांना पूर्वसंमती देण्यात आली. पूर्वसंमती दिलेल्या अर्जदारांपैकी सुक्ष्म सिंचन संचाची उभारणी करुन अनुदानासाठी प्रस्ताव सादर केलेल्या ३७२४ अर्जदार शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर अनुदानाची रक्कम रु.८.६७ कोटी जमा करण्यात आली आहे. उर्वरित अर्जदारांच्या खात्यावर अनुदान वर्ग करण्याची कार्यवाही सुरु आहे.

पूर्वसंमती नसतांना परस्पर सुक्ष्म सिंचन संच बसविलेल्या शेतकऱ्यांना अनुदान अनुज्ञेय ठरत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चारोटी नाका (जि.पालघर) येथील उड्डाणपूल बांधकाम भरावासाठी अवैधरित्या मातीचे उत्खन्न होत असल्याबाबत

**(३१) * ६०३६२ श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चारोटी नाका (जि.पालघर) उड्डाणपूल बांधकामाकरीता केलेल्या भरावासाठी हरितपट्टी नियमांचे उल्लंघन करुन कंत्राटदाराने लाखो ब्रास मातीचे उत्खन्न करुन फक्त २० हजार ब्रास मातीची रॉयल्टी भरुन शासनाचा लाखो रुपायाचा महसूल बुडविला असल्याचे दिनांक १३ जून २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केलेली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कंत्राटदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) डहाणू तालुक्यातील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक - ८ वरील चारोटी उड्डाणपुलाचे बांधकाम भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्याकडून करण्यात येत असून, सदर पुलाच्या कामाच्या अंदाजपत्रकामध्ये २३,१८८ ब्रास माती अंदाजित आहे. संबंधित कंत्राटदार यांच्या मागणीनुसार उपविभागीय अधिकारी डहाणू तसेच तहसिलदार डहाणू यांच्याकडून, एकूण १८,००० ब्रास माती - मुरुम या गौण खनिज उत्खननाची परवानगी देण्यात आली आहे. सदर उत्खननाची मोजणी केली असता, संबंधितांनी एकूण १६,९०९.७१ ब्रास माती - मुरुम या गौण खनिजाचे उत्खनन केले असल्याचे आढळून आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आंबेगाव (जि.पुणे) तालुक्यातील अवसरी खुर्द येथे बनावट खरेदीखत करुन अनधिकृत बांधकामे केल्याबाबत

**(३२) * ५५७१२ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आंबेगाव (जि.पुणे) तालुक्यातील अवसरी खुर्द येथे महार वतनाच्या गट नं.१,३,१९ व ६ या गटामध्ये गावातील काही व्यक्तींनी अतिक्रमण करुन अनधिकृत बांधकामे केली असल्याबाबत येथील नवतरुण ढोणे मंडळाने मा.महसूल मंत्री यांना माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे तक्रार केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गट क्र.१९/५३ या सामायिक क्षेत्रावर गावातील दोन व्यक्तींनी अतिक्रमण करुन महार वतनाच्या जमिनीचे बनावट खरेदीखत केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने महार वतनाच्या जमिनीवर अतिक्रमण करुन अनधिकृत बांधकामे व बनावट खरेदीखत करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशा आशयाची तक्रार महसूल विभागास प्राप्त झाली आहे.
(२), (३) व (४) मौजे अवसरी खुर्द येथील स.नं.१९/५३ ही महार वतनाची जमीन असून त्यामध्ये अधिकार अभिलेखात एकापेक्षा अधिक खातेदारांची नोंद आहे. सदर स.नं. चे वर्णन पुर्वी ४८/५३ असे होते. फेरफार क्र.१६३२३ दि.०१/०२/१९७१ अन्वये उक्त जमिनींच्या हस्तांतरणावरील निर्बंध "मुंबई गावची कनिष्ठ वतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम, १९५८" मधील तरतुदीनुसार दि.०८/०४/१९७० रोजी शेतसाऱ्याच्या १० पट रक्कम भरुन घेऊन तहसीलदार, आंबेगाव यांच्या दि.३०/०१/१९७१ च्या आदेशानुसार उठविण्यात आले.

सदर जमिनीच्या खातेदारांपैकी श्री.जिजाबा नागू ढोणे यांनी दि.२२/०९/१९७० रोजी नोंदणीकृत खरेदीखताने त्यांच्या कब्जातील १ गुंठा क्षेत्राची विक्री श्री.सदाशिव लक्ष्मण वायाळ यांना केली. परंतु नजरचुकीने मूळ मालकाचे नाव उक्त जमिनीच्या गा.न.नं. ७/१२ वर राहिल्याने मूळ मालकाच्या निधनानंतर त्याच्या वारसांची नावे गा.न.नं.७/१२ वर घेण्यात आली व या वारसांनी सदर जमिनीतून ९१ आर क्षेत्र श्री.सुनिल देशमुख यांना बेकायदेशीरपणे दि.१५/०३/२०११ रोजी नोंदणीकृत खरेदीखताने विक्री केली आहे.

स.नं.१९/५३ बाबत श्री.सुनिल देशमुख यांच्या नावे झालेले खरेदीखत बेकायदेशीर असल्याने त्या खरेदीखतानुसार झालेली फेरफार नोंद क्र.२१७४३ दि.३०/०४/२०११ अपर जिल्हाधिकारी, पुणे यांनी दि.३०/०५/२०१६ च्या आदेशान्वये रद्द केलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पनवेल नगर पालिकेने (जि.रायगड) सार्वजनिक वापरासाठी राखीव ठेवलेल्या**

## भूखंडावर गृह संकुलाकरीता सब स्टेशन उभारल्याबाबत

**(३३) * ५४४१९ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल नगर पालिकेने (जि.रायगड) सार्वजनिक वापरासाठी महावितरण करीता राखीव ठेवलेल्या १८१२ चौ.मी. भूखंडावर विकासक कल्पतरु श्रेयस साईट, पनवेल यांनी भूखंड क्र.४५८, ४५९, ४९१, ४९५ वरील गृह संकुलाकरीता बेकायदा खाजगी सब स्टेशन उभारुन गैरव्यवहार व अनियमितता केल्या प्रकरणी प्रधान सचिव, उर्जा विभाग यांनी एक वर्षापूर्वी चौकशी अहवाल सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अहवाल सादर होवूनही शासनाकडून अदयाप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर चौकशी अहवालाचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार सार्वजनिक सब स्टेशनकरीता असलेला राखीव भूखंड बेकायदा हडप केल्या प्रकरणी कंत्राटदार, महावितरणचे संबंधित अधिकारी आणि चौकशी अहवाल दडपून टाकणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) संचालक (दवसू), महावितरण यांनी त्यांच्या दि. ०१.१०.२०१५ च्या पत्रान्वये अहवाल सादर केला होता.

(२) हे खरे नाही.

(३) सदरचा अहवाल महावितरण कंपनीकडे पाठविण्यात आलेला असून पुढील कार्यवाहीसाठी कंपनीकडून अहवालाची छाननी सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अलिबाग (जि.रायगड) तालुक्यात कांदळवनांनी बहरलेल्या पाणथळ जागेवर बेकायदेशीर मातीचा भराव टाकल्याबाबत

**(३४) * ६३८१९ डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील बेलकडे, नवेदा-वेली, नागांव, अलिबाग-कुरुळ रस्त्याशेजारील खाडी, शहाबाज खाडी, रेवस बंदराजवळील मिळकतखार, मळा, आवळीपाडा व बागदांडा इ. ठिकाणी कांदळवनांनी बहरलेल्या पाणथळ जागांवर बेकायदा भराव टाकण्याचे काम सुरु असल्याने संपूर्ण अलिबाग तालुका पाण्याखाली जाण्याची भिती निर्माण झाली असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने पाणथळ जागेवर भराव टाकणाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) अलिबाग तालुक्यातील मौजे शहाबाज येथे मे, २०१६ मध्ये, बेलकडे येथे मे २०१६ मध्ये व शहापूर येथे मार्च २०१६ मध्ये मातीच्या अनधिकृत भरावाची प्रकरणे निदर्शनास आली आहेत. त्यानुसार शहाबाज व बेलकडे येथे भराव करणाऱ्यांकडून खुलासा मागविण्यात आला असून, सदर खुलासा प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार पुढील कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे. मौजे शहापूर येथे भराव केलेली जागा ग्रामपंचायतीच्या ताब्यात असल्याने, संबंधितांविरुध्द नियमानुसार कारवाई करण्याचे निदेश ग्राम विकास अधिकारी/ग्रामसेवक, ग्रामपंचायत शहापूर यांना देण्यात आले आहेत. तथापि, कांदळवनांनी बहरलेल्या पाणथळ जागेवर भराव केल्याचे आढळून आले नाही. तसेच, नवेदर-वेली, नागांव, कुरुळ, रेवस बंदराजवळील मिळकतखार, मळा, आवळीपाडा व बागदांडा या ठिकाणी बेकायदा भराव टाकण्याचे काम सुरु असल्याचे निदर्शनास आले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## मावळ (जि.पुणे) तालुक्यात बांधकामासाठी दगड, माती व खडीचे बेकायदेशिररित्या उत्खनन होत असल्याबाबत

**(३५) * ६४४२४ श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मावळ (जि.पुणे) तालुक्यात बांधकामासाठी आवश्यक असणाऱ्या दगड, माती

व खडीसाठी मोठ्या प्रमाणात बेकायदा उत्खनन सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मावळ तालुक्यात दिनांक २३ जूलै, १९८९ रोजी भाजे व दिनांक १९ नोव्हेंबर, २०१४ रोजी नायगाव येथे डोंगराचा कडा कोसळून जीवित हानी झाली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दगड, माती व खडीचे बेकायदा उत्खनन करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) मावळ तालुक्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीची काही प्रकरणे दृष्टोत्पत्तीस आलेली आहेत. गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीस आळा घालण्यासाठी तालुका स्तरावर दक्षता पथक गठीत करण्यात आले असून, सदर पथकाने वेळोवेळी केलेल्या तपासणीत मावळ तालुक्यात, सन २०१५-२०१६ मध्ये एकूण ३३७ प्रकरणात रुपये ४४.४१ लाख व एप्रिल २०१६ ते जुन २०१६ या कालावधीत ५ प्रकरणात रुपये ५१,२४०/- एवढी दंडाची रक्कम वसूल करण्यात आली आहे.
(२), (३) व (४) मावळ तालुक्यातील मौजे भाजे येथे दिनांक २३ जुलै, १९८९ रोजी अतिवृष्टीमुळे दरड कोसळून ३८ व्यक्ती व २५ ते ३० जनावरांचा मृत्यू झाला होता. तसेच मौजे नायगांव येथे दिनांक १९ नोव्हेंबर, २०१४ रोजी गट नंबर २५ मध्ये विकासकामार्फत रस्त्याच्या कडेला संरक्षक भिंतीचे काम चालू असताना त्यालगतचा डोंगराचा काही भाग भिंतीवर कोसळून एका मजूराचा मृत्यू झाला होता.

सदर घटनेनंतर केलेल्या पाहणीत विकासकाने, मौजे नायगांव येथील गट नंबर २५ मध्ये सपाटीकरण करण्यासाठी सन २०१२-२०१४ या कालावधीत रितसर स्वामित्वधन भरुन उत्खननास दिलेल्या परवानगीपेक्षा जास्त उत्खनन केल्याचे निदर्शनास आल्यावरुन, संबंधित विकासकावर दंडात्मक कारवाई करुन, दंडाची रक्कम रुपये ५,६२,४००/- व स्वामीत्वधनाची रक्कम रुपये १,४०,६००/- वसूल करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे ताडगाव (ता.मोहाडी, जि.भंडारा) येथील 'झुडपी जंगल' वर्गीकरणातील**

**जमिनीवरील अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत**

**(३६) * ६४४६८ श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे ताडगाव (ता.मोहाडी, जि.भंडारा) येथे 'झुडपी जंगला' करिता राखीव जमिनीवर सुरु असलेले अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत तत्कालीन तहसीलदार याच्याकडे वारंवार तक्रार देऊनही अतिक्रमणाविरोधी अदयापपर्यत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अतिक्रमण करणाऱ्यास मदत करणाऱ्या महसूल अधिकाऱ्यांची चौकशी करुन कारवाई करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.महसूल मंत्री व प्रधान सचिव, महसूल यांचेकडे दिनांक २६ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अतिक्रमण करणाऱ्यांवर व त्यांना मदत करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) मौजे ताडगाव (ता.मोहाडी, जि.भंडारा) येथे "झुडपी जंगल" या वर्गीकरणात मोडणाऱ्या "सरकार" च्या नावावरील जमिनीवर १२ लोकांनी अतिक्रमण केले होते. सदर अतिक्रमणधारकांना प्रत्येकी रु. १०००/- दंडाची रक्कम शासनाकडे भरणा करण्यास व १५ दिवसात अतिक्रमण खाली करण्यास तहसिलदार, मोहाडी यांनी आदेशीत केले व त्यानुसार अतिक्रमणधारकांकडून सदर रक्कम शासनाकडे जमा करण्यात आली आहे. उक्त १२ अतिक्रमणधारकांपैकी ११ अतिक्रमणधारकांनी अतिक्रमण खाली केले आहे, परंतु एका अतिक्रमणधारकांने मौजे ताडगाव येथील शासकीय झुडपी जंगल गट क्र. ९७ (आराजी १.४० हे.आर) या जमिनीवरील अतिक्रमण अद्याप खाली केले नाही. त्यामुळे त्याच्याविरुद्ध पोलिस स्टेशन आंधळगाव येथे फौजदारी फिर्याद दाखल करुन, दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. सदर प्रकरण मा. प्रथमश्रेणी न्याय दंडाधिकारी मोहाडी यांचे न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे.

प्रश्न भाग २ मध्ये नमूद केल्यानुसार स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी

सदर अतिक्रमण थांबविण्याची कार्यवाही तहसिलदार यांनी न केल्यामुळे त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्याची तक्रार एप्रिल २०१५ मध्ये केली होती. तथापि वरील वस्तुस्थिती पाहता प्रश्नाधीन अतिक्रमणाबाबत कार्यवाही करण्यात आली आहे.

----------------

## मुखेड (जि.नांदेड) तालुक्यातील लेंडी प्रकल्पाच्या धरणग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(३७) * ५८२५३ श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुखेड (जि.नांदेड) तालुक्यात होत असलेल्या आंतरराज्यीय लेंडी प्रकल्पाचे काम मागील अनेक महिन्यापासून धरणग्रस्तांनी बंद पाडले असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जोपर्यंत लेंडी धरणातील धरणग्रस्तांच्या मागण्या व त्यांचे योग्य जागी पुनर्वसन होणार नाही तोपर्यंत लेंडी धरणाचे काम बंद पाडण्याचा निर्णय समितीचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांनी घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लेंडी धरणातील धरणग्रस्तांच्या मागण्या व त्यांचे योग्य जागी पुनर्वसन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

प्रकल्पाच्या धरणाचे काम दि. ६/४/२०११ पासून बंद आहे.

(२) होय.

(३) प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रातील १२ गावठाणांचे पुनर्वसन ११ ठिकाणी करावयाचे असून ५ ठिकाणी नागरी सुविधांची कामे प्रगत आहेत. २ प्रकरणी निविदा कार्यवाही प्रगत असून ४ प्रकरणी भूसंपादन कार्यवाही प्रगत आहे.

प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांसंदर्भात मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दि. २२/८/२०१४ रोजी बैठक संपन्न झाली. त्यात प्रथमत: ६ गावठाणात पुनर्वसन पूर्ण करावे, उर्वरित ४ गावठाणांची जागा निश्चित करुन मुक्रमाबाद वगळता सर्व गावांचे पुनर्वसन करण्यात यावे, धरणात अंशत:

पाणीसाठा निर्माण करावा, असे ठरले. तसेच धरणग्रस्तांच्या मागण्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करण्याचेही ठरले.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सांगोले व पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यात वादळामुळे विद्युत पोल व ट्रान्सफॉर्मर कोसळून वीज पुरवठा खंडित झाल्याबाबत

**(३८) * ५५२९२ श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगोले व पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यातील भाळवणी गटातील १५ गावामध्ये माहे मे व जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान आलेल्या वादळामुळे अनेक गावातील २५० पेक्षा जास्त विद्युत पोल व ट्रान्सफॉर्मर कोसळल्यामुळे वीज पुरवठा खंडित झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत तेथील ग्रामस्थांनी व लोकप्रतिनिधींनी वारंवार तक्रारी करूनही वीज पुरवठा खंडित झालेल्या गावातील विद्युत पोल व ट्रान्सफॉर्मर अदयापर्यंत बसविण्यात आलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन पडलेले विद्युत पोल व ट्रान्सफॉर्मर बसविण्यात येऊन वीज पुरवठा पूर्ववत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे खरे आहे.
माहे मे व जून, २०१६ मध्ये आलेल्या वादळ-वारे व पाऊस यामुळे सांगोले तालुक्यात ४६६ विद्युत पोल व २ ट्रान्सफॉर्मर कोसळले व पंढरपूर तालुक्यातील भाळवणी गटातील १५ गावांमध्ये ६० विद्युत पोल व १ ट्रान्सफॉर्मर कोसळल्यामुळे सदर भागातील वीज पुरवठा खंडीत झाला होता.
(२) व (३) हे खरे आहे.
आपत्तीनंतर त्वरीत उपरोक्त परिसरातील पोल व ट्रान्सफॉर्मर यांच्या

पुर्नउभारणीचे काम महावितरण कंपनीकडून युध्द पातळीवर हाती घेण्यात आले आहे. सांगोले तालुक्यातील कोसळलेल्या ४६६ विद्युत पोलपैकी ३९८ पोल व २ ट्रान्सफॉर्मर यांच्या पुर्नउभारणीचे काम पूर्ण झाले आहे व त्या परिसरातील वीज पुरवठा सुरळीत करण्यात आला आहे. उर्वरित ६८ पोल उभारणीचे काम प्रगतीपथावर आहे.

तसेच भाळवणी गटातील १५ गावातील सर्व ६० विद्युत पोल व १ ट्रान्सफॉर्मर यांच्या पुर्नउभारणीचे काम पूर्ण झाले असून त्या भागातील वीज पुरवठा पूर्ववत करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.